1) लोकसत्ता पु. पान क्र.4 दि. 22/02/2023

### जानेवारीमध्ये सर्वोत्कृष्ट तपास

# आयुक्तांकडून सहा पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सहा पोलीस अधिकाऱ्यांना जानेवारीत विविध गुन्ह्यांचा छडा लावल्याने पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांच्या हस्ते 'सर्वोत्कृष्ट उकल' (बेस्ट डिटेक्शन)चा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यात गुन्हे शाखा १, २, ३, सायबर शाखा तसेच वालीव आणि पेल्हार पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

शहरात घडणाऱ्या क्लिष्ट आणि अवघड गुन्ह्यांचा तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना दर महिन्याला 'सर्वोत्कृष्ट उकल'चा पुरस्कार देऊन गौरविण्यात येतो.

मीरा रोडमध्ये अंकुश राज (वय २०) याची हत्या करण्यात आली होती. या हत्येचा तपास करून आठ आरोपींना गजाआड केल्याबद्दल मीरा रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह बादल व गुन्हे शाखा १चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांचा सन्मान करण्यात आला. दुसऱ्या घटनेत गोरेगावमधील महिलेने आपल्या पतीची सुपारी देऊन हत्या घडवून मृतदेह नायगाव येथे फेकला होता. याप्रकरणी गुन्हे शाखा २ने आरोपींना अटक केली. त्याबद्दल गुन्हे शाखा २चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहुजी रणावरे यांचा सन्मान करण्यात आला.

विरार येथील एका घरफोडीचा तपास करून गुन्हे शाखा ३च्या पथकाने एका टोळीला अटक केली होती. या टोळीने घरफोडीचे १४ गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. या तपासाबद्दल गुन्हे शाखा ३चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख यांना गौरवण्यात आले. तसेच शहरातील गटारांवरील झाकणे चोरणाऱ्या पाच जणांच्या टोळीला वालीव पोलिसांनी अटक केली होती. या टोळीमुळे वसई, मुंबई आणि ठाणे परिसरातील गुन्हे उघडकीस आणले होते. या कामगिरीबद्दल वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांचा उत्कृष्ट उकल केल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

#### फसवणूक करणाऱ्या टोळ्या जेरबंद

बनावट विमाच्या नावाने देशभर नागरिकांना गंडा घालणाऱ्या चौघा जणांना सायबर कक्षाने अटक करून ३२ गुन्हे उघडकीस आणले होते. पेल्हार पोलिसांनी एटीएम कार्डाची अदलाबदल करून नागरिकांची फसवणूक करणारी चार जणांची टोळी जेरबंद केली होती. या टोळीने १६ गुन्हे केल्याचे उघडकीस आले होते. या कामागिरीबद्दल सायबर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुजीत गुंजकर आणि पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत लब्धे यांचा सन्मान करण्यात आला.

2) पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# चारित्र्य पडताळणीसाठी महिन्याला २१०० अर्ज

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे पोलीस आयुक्तालयात चारित्र्य पडताळणीसाठी महिन्याला जवळपास २१०० अर्ज येत असल्याची माहिती आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय मुंबईला लागून असल्यामुळे मीरा-भाईंदर वसई-विरार शहरांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. या पोलीस आयुक्तालयामध्ये १६ पोलीस ठाणी येत असून या प्रत्येक पोलीस ठाण्यात वर्तवणूक व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज येत आहेत. नागरिकांना कोणत्याही नोकरीसाठी म्हणजेच शासकीय, निमशासकीय, खासगी संस्था इत्यादींमध्ये वर्तवणूक व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे, तसेच पासपोर्ट काढण्यासाठी देखील अर्जदाराची चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. पोलीस आयुक्तालयामध्ये चारित्र्य पडताळणीकरिता ऑफलाइन व ऑनलाइन पद्धतीने वर्षभरात अनेक अर्ज येतात. नोकरभरती तसेच विविध कामांमध्ये लागणारे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र घेण्यासाठी शासनाने ऑनलाइन व ऑफलाइन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांची धावपळ कमी झाली आहे. परंतु अनेक नागरिकांना ऑनलाइन पद्धती वापरता येत नसल्यामुळे व याबद्दल माहिती नसल्यामुळे ते नागरिक ऑफलाइन पद्धतीचा वापर करत आहेत. यामध्ये ऑनलाइन पद्धतीचा वापर जास्त प्रमाणात होताना दिसत आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात प्रत्येक महिन्याला ऑनलाइन चारित्र्य पडताळणी करण्यासाठी २०४० अर्ज दाखल केले जातात. तर ऑफलाइन चारित्र्य पडताळणीसाठी फक्त ९८ अर्ज केले जातात. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये चारित्र्य पडताळणीसाठी २०२१ ते १२ फेब्रुवारी २०२३ पर्यंत ऑफलाइन पद्धतीने एकूण १,७७५ अर्ज दाखल झाले होते. यामध्ये ऑफलाइन चारित्र्य पडताळणीसाठी २०२१ मध्ये ७८६, २०२२ मध्ये ८५९ अर्ज, तर २०२३ मध्ये १२ फेब्रुवारीपर्यंत १३० अर्ज प्राप्त झालेले आहेत.

CS CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत पान क्र. 2 दि. 22/02/2023

(3)

# त्याने चिमुकलीला बिहारमध्ये नेले पळवून

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नालासोपाऱ्याच्या आचोळे डोंगरी येथील नेहा बिडलान (२१) यांची एक वर्षाची मुलगी सान्वी हिचे बुधवारी १५ फेब्रुवारीला दुपारी साडेचारच्या सुमारास सुरक्षारक्षक आरोपी राजेंद्र कुमारने अपहरण केले होते. तक्रार दिल्यानंतर चिमुकलीच्या शोधासाठी पोलिसांनी जंग जंग पछाडले. अखेर अपहरण झालेली ही चिमुकली आचोळे पोलिसांच्या पथकाला बिहारमध्ये आरोपीच्या गावी सापडली आहे. आरोपी व अपहरण झालेल्या चिमुकलीला पोलिस बुधवारी नालासोपाऱ्यात घेऊन येणार आहेत.

आचोळे पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून सान्वीच्या शोधासाठी वेगवेगळी पथके तयार केली होती. गुन्हे शाखेची तिन्ही युनिट शर्थीचे प्रयत्न करीत होती. पळवून नेताना काही ठिकाणचे सीसीटीव्ही



सान्वी



राजेंद्र कुमार

फूटेज पोलिसांना मिळाले होते. पोलिसांची सर्वत्र जोरदार शोधमोहीम सुरू होती. अखेर आचोळे पोलिसांना ती मुलगी बिहारमध्ये सापडली. आरोपीने या मुलीचे अपहरण का व कोणत्या कारणामुळे केले याचा पोलिस तपास करीत आहेत. आरोपी हा गेल्या सात ते आठ वर्षांपासून येथे काम करीत होता. याबाबत मुलगी आल्यावर पत्रकार परिषद घेणार असल्याचे आचोळ्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांनी 'लोकमत'ला सांगितले.

(4)

# लग्नानंतर तीन महिन्यांतच संपले प्रेम

## नवविवाहितेची आत्महत्या; पतीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरारोड : प्रेमविवाह करून तीन महिने होत नाही, तोच चारित्र्याचा संशयावरून मारझोड करणाऱ्या पतीच्या जाचाला कंटाळून नवविवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भाईंदरमध्ये घडली आहे. पोलिसांनी पतीला अटक केली आहे.

भाईंदर पश्चिमच्या मूर्धा गाव सार्वजनिक शौचालयजवळ राहणाऱ्या २० वर्षीय किरण रमेश चव्हाण आणि जवळच राई शिवनेरी येथे राहणारी २० वर्षीय नेहा मोहन दामले यांनी गेल्यावर्षी नोव्हेंबरमध्ये एका मंदिरात प्रेमविवाह केला होता. नेहा लग्नानंतर किरणसोबत माहेरी येत-जात होती. तिच्या आईसह कुटुंबीयांचेही नेहाच्या सासरी येणे-जाणे होते, परंतु लग्नाच्या काही दिवसांनीच किरण कामाला जात नाही, कोणाशी फोनवर बोलली तरी संशय घेऊन मारझोड करतो, असे नेहाने आई सविता हिला सांगितले. त्यावर सविताने त्यांची समजूत काढली. जानेवारीत किरण दुचाकी घेऊन आला आणि हप्ता भरायचा म्हणून नेहाच्या वडिलांकडून १० हजार रुपये उसने घेतले. १८ फेब्रुवारीला किरणने सविता यांना कॉल करून नेहा रात्री-अपरात्री कोणाशी, तरी फोनवर बोलते, अशी तक्रार केली असता सविता यांनी दोघांना घरी बोलावून समजावले.

### समजूत काढूनही घेतला गळफास

आईने समजूत काढल्याच्या दुसऱ्या दिवशी नेहाने आईला कॉल करून मला घरी घेऊन जा, असे सांगितले. सायंकाळी मात्र नेहाने दरवाजा आतून बंद केल्याचे सविता यांना सांगितले. त्यानंतर काही वेळाने सविता यांनी किरणला विचारणा केली असता नेहाने गळफास घेतल्याचे त्याने सांगितले. तिला भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात नेले असता तिचा आधीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. सविता यांच्या फिर्यादीवरून भाईंदर पोलिसांनी २० फेब्रुवारीला गुन्हा दाखल करून किरणला अटक केली आहे. मंगळवारी ठाणे न्यायालयाने त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

(5)

# दहा वर्षांच्या मुलीचे अपहरण

नालासोपारा : वसईत दहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. वसईच्या पाचूबंदर परिसरात राहणारी अल्पवयीन मुलगी मामाच्या घरातून आईकडे जाण्यासाठी १९ फेब्रुवारीला संध्याकाळी चारच्या सुमारास निघाली होती, मात्र ती घरी पोहोचली नाही. तिचा सर्वत्र शोध घेऊनही ती न सापडल्याने तिचे आरोपीने अपहरण केल्याचा संशय आल्याने मुलीच्या आईने सोमवारी वसई पोलिस ठाण्यात मुलीच्या अपहरणाची तक्रार दाखल केली आहे.

(6)

# दारूच्या नशेत घेतला गळफास

नालासोपारा : विरारमध्ये एका वृद्धाने दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. सतीश गुजराती (वय ६२) असे त्यांचे नाव असून रविवारी रात्री बाराच्या सुमारास नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांना तातडीने विरारच्या संजीवनी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. तेथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सोमवारी विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 22/02/2023

7) पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# वसईतील शिवसैनिक ठाकरेंसोबतच



## निवडणूक आयोग आणि सरकारचा निषेध

नालासोपारा : निवडणूक आयोगाने शिंदे गटाला धनुष्यबाण चिन्ह व शिवसेना नाव जाहीर केले. ही चोरी आहे, असा संताप व्यक्त करत वसईतील शिवसैनिकांनी आम्ही उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यासोबत राहणार आहोत, असे ठामपणे सांगितले. संतप्त शिवसैनिकांनी निवडणूक आयोगाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत वसई पश्चिम येथील बस डेपोच्या बाहेरील मार्गावर हे आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हाप्रमुख शिरीष चव्हाण, शहरप्रमुख संजय गुरव, तालुकाप्रमुख राजाराम बावर, उपशहर प्रमुख शशिभूषण शर्मा, माजी विरोधी पक्षनेते विनायक निकम, संतोष टेंबवलकर, उपतालुकाप्रमुख अनिल चव्हाण, महिला जिल्हा संघटक किरण चेंदवणकर, नम्रता वैती, विवेक पाटील, गणेश भायदे, दिलीप चेंदवणकर, सुरेंद्र सिंग, जेसीथा फिंच, महिला कार्यकर्त्या, पदाधिकारीदेखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. निवडणूक आयोगाला पक्षांतर्गत असलेले निर्णय घेण्याची गरज नाही. मात्र मोदी सरकारच्या दबावाखाली हे सर्व सुरू आहे. दबाव तंत्र वापरून नियमाला बगल दिली जात आहे. उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांच्यासोबत असंख्य कार्यकर्ते आहेत. चिन्ह आणि नाव चोरून काही उपयोग होणार नाही. शिंदे गटाने केलेले हे सूडाचे राजकारण आहे. आम्ही ठाकरेंसोबत आहोत. निवडणूक आयोग, केंद्र व राज्य सरकारचा जाहीर निषेध करण्यासाठी वसईत मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले. हाच आमचा विजय आहे, असे शहरप्रमुख संजय गुरव व तालुकाप्रमुख राजाराम बावर यांनी सांगितले.

8) सकाळ पान क्र. 3

# अभिनेता शिझानकडून जामीन अर्ज मागे

## तुनिषा आत्महत्येप्रकरणी वसईत अर्ज

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २१ : अभिनेत्री तुनिषा शर्मा हिच्या आत्महत्या प्रकरणात संशयित आरोपी शिझान खान याने मुंबई उच्च न्यायालयात केलेला जामीन अर्ज आज (ता. २१) मागे घेतला. या प्रकरणी त्याने वसई सत्र न्यायालयात पुन्हा जामीन अर्ज केला आहे.

अलिबाबा - दास्ताने ए काबूल या मालिकेत काम करणारी तुनिषा शर्मा या २१ वर्षांच्या अभिनेत्रीने चित्रीकरण सेटवरच गळफास लावून आत्महत्या केली होती. या प्रकरणात पोलिसांनी नुकतेच पाचशे पानी आरोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. यामध्ये त्याच्यावर तुनिषाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शिझानच्या वतीने आज हा जामीन अर्ज मागे घेण्यात आला; मात्र त्याने पुन्हा एकदा वसई सत्र न्यायालयात अर्ज केला असून लवकरच यावर सुनावणी होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी दोघांच्या मोबाईलसह आणखी एक फोन फॉरेन्सिक विभागाकडे पाठवला आहे. आत्महत्येच्या दिवशी ती नेहमीप्रमाणे आनंदी मूडमध्ये होती; मात्र शिझानच्या रूममधून बाहेर पडताना तणावात होती, असे सीसी टीव्हीतील चित्रीकरणात दिसत आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. त्यांच्यामधील मोबाईल चॅट आरोपपत्रात दाखल करण्यात आले आहे.

9) लोकमत पृ. पान 1

# साडेतेरा हजार उमेदवारांचे पोलिस होण्याचे स्वप्न 'बाद'

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर - वसई-विरार पोलीस आयुक्तालयात पोलिस शिपाई व पोलिस वाहनचालक होण्यासाठी आलेल्या ४९ हजार ४७९ उमेदवारांपैकी तब्बल १३ हजार ५२३ उमेदवार शारीरिक चाचणीत बाद झाले आहेत.

पोलिस आयुक्तालयात पोलिस शिपाई, वाहनचालकांच्या ९९६ पदांसाठी भरती सुरू आहे. यासाठी ७१ हजार ९५१ इच्छुकांचे अर्ज आले होते. त्यातही १२ हजार १०४ महिला, ५९ हजार ८४७ पुरुष उमेदवारांचा समावेश आहे. शिपाई व वाहनचालक पदासाठी बी.टेक, एम.ई, बी.ई, एम.बी.ए, बी.बी.ए, बी.फार्म, एम. कॉम, एम.एस.सी, बी.एस.सी, एल.एल.बी. केलेल्या उच्चशिक्षितांनी अर्ज केले आहेत.

पोलिस भरतीसाठी शारीरिक क्षमता आवश्यक असल्याने भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर इच्छुकांची शारीरिक चाचणी घेण्यात आली होती. शारीरिक चाचणीसाठी आलेल्या ४९ हजार ४७९ उमेदवारांनी मैदानात आपला फिटनेस दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यातील ३५ हजार ९५६ उमेदवार शारीरिक चाचणीत उत्तीर्ण झाले असून १३ हजार ५२३ उमेदवार अनफिट ठरले आहेत.

### २२ हजार ४७२ अर्जदार आलेच नाहीत

९९६ पदांच्या पोलिस भरतीसाठी अर्ज करणाऱ्या ७१ हजार ९५१ तरुण-तरुणींपैकी शारीरिक चाचणीसाठी ४९ हजार ४७९ जणच मैदानात उतरले, तर अर्ज करूनही २२ हजार ४७२ अर्जदार आलेच नाहीत. त्यामुळे अर्ज करूनसुद्धा चाचणीसाठी न आलेल्यांची संख्यादेखील मोठी आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

10) लोकमत पृ. पान क्र. 4

दि. 22/02/2023

# रस्ते गुळगुळीत म्हणून वाहन पळवाल तर दोन हजारांचा दंड

## मीरा-भाईंदरमध्ये वेगमापक यंत्रच नाही : वेगमर्यादेचे सर्रास उल्लंघन

धीरज परब
लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिका हद्दीतून राष्ट्रीय महामार्ग व अंतर्गत मुख्य मार्ग असले तरीही पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेकडे वाहनांचा वेग मोजणारे एकही यंत्र नाही. त्यामुळे दहिसर चेकनाक्यापासून वरसावे नाक्यापर्यंतचा राष्ट्रीय महामार्ग, वरसावे नाका ते काजूपाडापर्यंतचा घोडबंदर महामार्ग तसेच शहरातील अंतर्गत रस्त्यांवर वाहनांचा वेग मोजणारी यंत्रणाच पोलिसांकडे नाही. घोडबंदर खिंडीत रुंदीकरण झाल्यापासून वाहनांचा वेग वाढला आहे. त्यामुळे चालक वाहतूक नियमांसह वेग मर्यादेचे सर्रासपणे उल्लंघन करतात.

भाईंदर-उत्तन रस्ता, शहरातील अंतर्गत रस्त्यांवरदेखील भरधाव वाहने चालवली जातात. अनेक दुचाकीचालक वर्दळीच्या ठिकाणीसुद्धा वेडीवाकडी वळणे घेत वेगाने दुचाकी चालवितात. त्यांच्यामुळे अन्य वाहन चालक दचकतात. दुचाकींचा अपघात होऊ नये, यासाठी पोलिससुद्धा अशा भरधाव दुचाकींना अडवणे टाळतात. घोडबंदर खिंडीत भरधाव वाहनांमुळे बिबट्यांचे बळी गेले आहेत. आता वरसावे खाडी पूल सुरू होताच वाहने आणखी सुसाट पळणार आहेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. पोलिस आयुक्तालय झाले तरी वेग मोजण्याची यंत्रणाच नसल्याने कारवाई तरी कशी करायची, असा प्रश्न वाहतूक पोलिसांचा आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांना वेग मोजणारी यंत्रणा लवकरच उपलब्ध करून देण्यासह शहरात वेगमर्यादा मापक यंत्रणासह सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज आहे.



### वेगमर्यादेचे उल्लंघन केले म्हणून किती दंड?

| वाहन | दंड |
|---|---|
| दुचाकी-तीनचाकी | १००० रु. |
| ट्रॅक्टर | १५०० रु. |
| चारचाकी | २००० रु. |
| इतर अवजड | ४००० रु. |




### वेगच मोजला जात नाही, तर दंडवसुली कशी करणार?

■ मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालय अस्तित्वात आले आहे. मीरा भाईंदर वाहतूक शाखा आहे; परंतु वेग मोजण्याचे यंत्रच नसल्याने पोलिसांना सुसाट वाहनांवर कारवाईच करता येत नाही.

### राष्ट्रीय व राज्य महामार्गावर वाहने सुसाट

■ मीरा भाईंदर हद्दीतून जाणारा राष्ट्रीय महामार्ग व घोडबंदर महामार्ग, भाईंदर ते उत्तन - गोराई मार्ग हे सुसाट वाहनांमुळे जीवघेणे ठरले आहेत. शिवाय शहरातील अंतर्गत रस्त्यांवरसुद्धा वेग मर्यादेचे उल्लंघन करून वाहने चालवली जात असल्याने अपघाती मृत्यू व जखमींचे प्रमाण वाढत आहे.

राज्य महामार्ग पोलिसांकडेच वेग मोजण्याची यंत्रणा आहे. मात्र मीरा भाईंदर हद्दीतील महामार्ग त्यांच्या अखत्यारीत येत नाहीत. पोलिस आयुक्तालयामार्फत वाहतूक शाखेसाठी वेगमापक यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. लवकरच ही यंत्रणा उपलब्ध होईल.

- देवीदास हंडोरे, पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, मीरा भाईंदर

11) पुढारी पृ. पान क्र. 1

# मनपा सफाई कर्मचाऱ्याची लूट

**मिरारोड :** मिरा-भाईंदर महापालीकेमध्ये सतीश राजेंद्र राऊत हा कंत्राटी सफाई कामगार म्हणून काम करत आहे. राऊत हा कनाकीया येथून पगार घेऊन मिरारोड रेल्वे स्थानक येथे गेला. तेथून तो चालत जात असताना दुपारी सव्वा दोनच्या सुमारास ३ इसम एका स्कुटी मोटारसायकलवरून त्याच्याजवळ आले. त्याला बोलले की, आम्हाला कशाला आवाज दिला असे बोलून एका इसमाने मोटार सायकवरुन उतरुन कानाखाली मारली व शिवीगाळी केली. त्यातील एकाने रिक्षामध्ये जबरदस्तीने त्याला बसवुन विजय पार्क येथे घेवुन गेले. त्यावेळी राऊत याला त्या इसमांनी रिक्षातुन जबरदस्ती उतरवुन मारहाण केली. राऊत याच्या हातात कसली तरी पुडी ठेवुन मोबाईल मध्ये व्हीडीओ करुन तो व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी दिली. त्याच्या खिशात असलेले १४,७०० रुपये जबरदस्तीने काढुन घेवुन पळुन गेले. त्यामुळे त्या अनोळखी इसमा विरोधात नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नयानगर पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत

केंद्रीय गृहखात्याची सूचना : महिला पोलिसांचे प्रमाण वाढवावे

# पोलिस दलात 'लेडी सिंघम' किती?

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : राज्यांनी त्यांच्या पोलिस दलामध्ये महिला पोलिसांचे प्रमाण ३३ टक्क्यांपर्यंत वाढवावे, अशी सूचना केंद्रीय गृह खात्याने केली आहे. पोलिस दलात रिकाम्या पदांपैकी काहींचे रूपांतर महिला पोलिस शिपाई व उपनिरीक्षक पदांमध्ये करावे असेही या खात्याने म्हटले आहे. महिला पोलिसांची भरती व त्यांची संख्या वाढविण्याची जबाबदारी राज्यांची आहे. पोलिस दलात पुरुष व महिला पोलिस संख्येत समतोल राखण्याचे काम राज्यांनी करायचे आहे.



## राज्यात महिला पोलिसांचे प्रमाण केवळ ११.७५ टक्के

देशात महिला पोलिसांची संख्या वाढवण्यासाठी केंद्र सरकार गांभीर्याने काम करत आहे. पोलिस दलातील संख्या ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याच्या सूचना केंद्राने वारंवार राज्यांना दिल्या आहेत. सध्या आपल्या राज्यात महिला पोलिसांचे प्रमाण केवळ ११.७५ टक्के आहे.

## आयुक्तालयात २६७ महिला पोलिस

मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयात सध्या २६७ महिला पोलिस कार्यरत असून त्यात २४३ महिला अंमलदार आणि २४ महिला अधिकारी यांचा समावेश आहे.



## प्रत्येक पोलिस ठाण्यात १३ महिला पोलिस

प्रत्येक पोलिस ठाण्यात १३ महिला पोलिस ठेवण्याचे सूत्र निश्चित केले आहे. प्रत्येक पोलिस ठाण्यात तीन महिला उपनिरीक्षक, १० महिला हवालदारांची नियुक्ती करावी. त्यामुळे महिला हेल्प डेस्क २४ तास काम करू शकणार आहेत.




तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणात वालीव पोलिस ठाण्यातील तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मी बोरकर यांनी आरोपी शिजान खानविरुद्ध गुरुवारी वसई न्यायालयात ५२४ पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. यात शिजान खान भेटून आल्यानंतर तिने आत्महत्या केल्याचे नमूद केले असून त्याला तिच्या आत्महत्येप्रकरणी दोषी ठरवले आहे.

ओमान येथे घरकामासाठी गेलेल्या वसईच्या महिलेला डांबून ठेवले होते. तक्रारी अर्ज प्राप्त झाल्यावर विशेष शाखेच्या पोलिसांनी त्या महिलेची पाच दिवसांत सुखरूप सुटका केली. पो.निरीक्षक कुमारगौरव धादवड, महिला सहायक पो.निरीक्षक संजीवनी सोलनकर, महिला पो. हवालदार मंजूषा गुप्ता व सीमा दाते यांनी कामगिरी पार पाडली.



Scanned with CamScanner

लोकमत

# त्याने चिमुकलीला बिहारमध्ये नेले पळवून

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : नालासोपाऱ्याच्या आचोळे डोंगरी येथील नेहा बिडलान (२१) यांची एक वर्षाची मुलगी सान्वी हिचे बुधवारी १५ फेब्रुवारीला दुपारी साडेचारच्या सुमारास सुरक्षारक्षक आरोपी राजेंद्र कुमारने अपहरण केले होते. तक्रार दिल्यानंतर चिमुकलीच्या शोधासाठी पोलिसांनी जंग जंग पछाडले. अखेर अपहरण झालेली ही चिमुकली आचोळे पोलिसांच्या पथकाला बिहारमध्ये आरोपीच्या गावी सापडली आहे. आरोपी व अपहरण झालेल्या चिमुकलीला पोलिस बुधवारी नालासोपाऱ्यात घेऊन येणार आहेत.

आचोळे पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून सान्वीच्या शोधासाठी वेगवेगळी पथके तयार केली होती. गुन्हे शाखेची तिन्ही युनिट शर्थीचे प्रयत्न करीत होती. पळवून नेतानाचे काही ठिकाणचे सीसीटीव्ही फूटेज पोलिसांना मिळाले होते. पोलिसांची सर्वत्र जोरदार शोधमोहीम सुरू होती. अखेर आचोळे पोलिसांना ती मुलगी बिहारमध्ये सापडली. आरोपीने या मुलीचे अपहरण का व कोणत्या कारणामुळे केले याचा पोलिस तपास करीत आहेत. आरोपी हा गेल्या सात ते आठ वर्षांपासून येथे काम करीत होता. याबाबत मुलगी आल्यावर पत्रकार परिषद घेणार असल्याचे आचोळ्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांनी 'लोकमत'ला सांगितले.



सान्वी



राजेंद्र कुमार

Mumbai Main
Page No. 4 Feb 22, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

mid·day
Jagran February 22, 2023, Wednesday, 40 pages ₹5, Mumbai | Phone : 6831 4800 | Fax : 2642 6812 | www.mid-day.com

# PROMISED A JOB, WOMAN SOLD FOR MARRIAGE AT ₹2L BY INSTA FRIEND

## MBVV police suspect many more Maharashtrian women, lured with the promise of police jobs in Rajasthan, have been sold for marriage

**DIWAKAR SHARMA**
diwakar.sharma@mid-day.com

THE Mira Bhayandar Vasai Virar police have busted a racket where Maharashtrian women are lured on the pretext of police jobs in Rajasthan, where they are sold as brides. One woman, a single mother aged 27, has been rescued and the groom arrested. The police said there is at least one more Maharashtrian woman trapped in Rajasthan. They suspect more cases might emerge once the mastermind is nabbed. » P03



Arnala police station; (inset) Chetan Bharti, who paid ₹2 lakh to marry the woman lured to Rajasthan by a man she befriended on Instagram

***'The Instagram friend, Dinesh Puri, trapped the woman in November. She lived with her daughter and parents in Virar and worked in a Mira Road hospital. He asked her to reach Aurangabad for "police training" after which he sent her to Rajasthan'***

Kalyanrao Karpe, senior inspector, Arnala police station



Scanned with CamScanner

CMYK
MHT
# मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, बुधवार 22 फरवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, फाल्गुन शुक्ल पक्ष द्वितिय | 07.03 am / 06.41 pm | | अधिकतम 32°C / न्यूनतम 23°C | NSE / BSE | Rs. 56 730 Per 10 gm / Per Kg |

# नकल करने वालों पर राज्य बोर्ड का नकेल

## नकल करने वालों की अब खैर नहीं



**नालासोपारा।** 10वीं और 12वीं की बोर्ड परीक्षाओं में कोई बुरा आचरण न हो इसके लिए राज्य बोर्ड द्वारा विशेष ध्यान रखा जा रहा है। 10वीं और 12वीं की बोर्ड परीक्षाओं के दौरान मोबाइल या अन्य माध्यमों से पेपर लीक होने से रोकने के लिए तरह-तरह के विकल्प अपनाए जा रहे हैं। इसलिए परीक्षा में झेरॉक्स की दुकानें बंद रखने का आदेश दिया गया है। 10वीं और 12वीं की बोर्ड परीक्षाओं में नकल हो इस लिए महाराष्ट्र बोर्ड ने सख्त कदम उठाया है। जिले में 10वीं के 116 केंद्रों पर 60 हजार 163 और 12वीं के 54 केंद्रों पर 49 हजार 116 परीक्षार्थी परीक्षा देने वाले हैं।

### 10 टीमें रखेंगे नजर

महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकेंडरी एंड हायर सेकेंडरी एजुकेशन के अनुसार 12वीं की परीक्षा 21 फरवरी से शुरू होकर 20 मार्च को खत्म होगी जबकि 10वीं की परीक्षा 1 मार्च से शुरू होगी। परीक्षा अवधि के दौरान परीक्षा केंद्र पर किसी भी तरह की धांधली को रोकने के लिए पालघर जिले में जिला परिषद की 10 टीमें तैनात रहने वाली हैं। प्रत्येक तालुका स्तर पर स्कॉट की टीमें अलग-अलग होंगी।

### झेरॉक्स सेंटर रहेंगे बंद

नकलचियों पर अब शिक्षा बोर्ड ने नकेल कसने की तैयारी कर ली है। परीक्षा में नकल करने वाले छात्र के खिलाफ आपराधिक कार्रवाई की जाएगी। महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकेंडरी एंड हायर सेकेंडरी एजुकेशन ने यह चेतावनी दी है। परीक्षा अवधि के दौरान झेरॉक्स केंद्रों पर छात्रों की भीड़ लगी रहती है, झेरॉक्स केंद्रों से मिनी कॉपियाँ प्रदान की जाती हैं। नकल रोकने के लिए परीक्षा केंद्र के 100 मीटर के दायरे में झेरॉक्स सेंटर बंद कर दिए जाएंगे।

### आपराधिक मामला दर्ज किया जाएगा

परीक्षा के प्रश्नपत्र की चोरी करने, या प्रश्नपत्र को मोबाइल पर प्रसारित करने पर परीक्षार्थी छात्रों की परीक्षा रद्द करने का निर्णय लिया गया है। साथ ही परीक्षार्थी के खिलाफ आपराधिक मामला भी दर्ज किया जाएगा।

**-शिक्षा विभाग, पालघर**

Scanned with CamScanner